रजिस्टर नं. :
के. पीआर. बी.एन.के. ३०२ दि. ५ एप्रिल १९६३

॥ जय सहकार ॥

स्थापना : दि. २ जून १९६३




# ५१ वा वार्षिक अहवाल
सन २०२०-२०२१

## सुवर्ण महोत्सवी बँक

ऑडिट वर्ग 'अ'

# जनता सहकारी बँक लिमिटेड, आजरा.

मुख्य कार्यालय - मेन रोड, आजरा, जि. कोल्हापूर. ४१६५०५ फोन नं. ०२३२३-२४६२५२,
Web site : www.janatabankajara.com, Email : info@janatabankajara.com

# * संचालक मंडळ *

## २०२० - २०२१

चेअरमन



श्री. मुकुंद ब. देसाई

व्हा. चेअरमन



श्री. बाबाजी भा. नाईक



श्री. महादेव के. टोपले



श्री. रणजित ना. देसाई



श्री. विजय बा. देसाई



श्री. सहदेव सं. नेवगे



श्री. महादेव ल. पोवार



श्री. जोतीबा गुं. चाळके



श्री. जयवंत गुं. शिंपी



सौ. रेखा सु. देसाई



सौ. वृषाली प्र. कोंडुसकर



श्री. संदिप शि. कांबळे



श्री. सुनिल खं. डोणकर



श्री. शामराव कु. चौगुले



श्री. एस. एम. अस्वले
तज्ञ संचालक



श्री. के. जी. पटेकर
तज्ञ संचालक



श्री. एम. बी. पाटील
मुख्य कार्यकारी अधिकारी



श्री. एम. आर. फर्नांडीस
असि. जनरल मॅनेजर



श्री. पी. ए. सरंबळे
बोर्ड सेक्रेटरी व
प्रशासन विभाग प्रमुख



श्री. एम. वाय. सावंत
मुख्य वसुली अधिकारी



श्री. एस. एच. चौगुले
अकौंटन्ट

# जनता सहकारी बँक लिमिटेड, आजरा. जि. कोल्हापूर

## ५९ वी वार्षिक साधारण सभा नोटीस

(फक्त सभासदांकरिता)

बँकेच्या सर्व सभासदांना सुचित करण्यात येते की, बँकेची ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार दिनांक २६/०९/२०२१ इ. रोजी दुपारी ठिक १.०० वाजता ऑनलाईन (VC/OAVM) पद्धतीने घेतली जाईल. तरी सर्व सभासदांना विनंती की, आपले मोबाईलवर पाठविलेल्या लिंकवर क्लिक करून सभेत सहभागी व्हावे ही नम्र विनंती. वार्षिक अहवालाची प्रत बँकेच्या https://janatabankajara.com या अधिकृत संकेतस्थळावर तसेच सर्व शाखांमधून उपलब्ध होतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

### सभेपुढील विषय

१) मागील दिनांक १४/०२/२०२१ इ. रोजी झालेल्या वार्षिक साधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.
२) सन २०२०-२०२१ सालचा वार्षिक अहवाल, ताळेबंद, नफा - तोटा पत्रके स्विकृत करणे.
३) मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या दिनांक ३१ मार्च २०२१ इ. चे नफा विभागणीस मंजूरी देणे.
४) सन २०२०-२०२१ सालात बजेट पेक्षा जादा झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
५) सन २०२१-२०२२ साला करीता संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
६) बँकेचे संचालक व त्यांचे नातेवाईक याना दिलेल्या कर्जाची नोंद घेणे.
७) मा. वैधानिक लेखापरिक्षक यांचा सन २०२०-२०२१ सालचा ऑडीट रिपोर्ट अवलोकनार्थ घेणे.
८) एकरकमी कर्ज परतफेड योजने अंतर्गत सुट दिलेल्या तसेच निर्लेखित केलेल्या व करावयाच्या कर्ज खात्यांची नोंद घेवून त्यास मान्यता देणे.
९) सन २०२१-२०२२ या सालाकरीता वैधानिक लेखापरिक्षक नेमणूकीबाबत रिझर्व बँक ऑफ इंडिया यांचेकडील निर्देशानुसार केलेल्या कार्यवाहीची नोंद घेवून मंजूरी देणे.
१०) सन २०२२-२०२३ या वर्षाकरीता अंतर्गत हिशोब तपासणीस व समवर्ती तपासणीस यांची नियूक्ती करणे व त्यांचा मेहनताना ठरविणे.
११) दि. ३१/०८/२०२१ रोजी झालेल्या मा. संचालक मंडळ मिटींगमध्ये सुचविलेल्या पोट नियम दुरुस्तीबाबत चर्चा करुन अंतिम मंजूरी देणे.
१२) रिझर्व बँकेच्या निर्देशानुसार श्री. मारुती भरमा पाटील यांची बँकेच्या सी.ई.ओ. पदी फेर नेमणूक केलेल्या कार्यवाहीची नोंद घेवून मंजूरी देणे.
१३) ५९ वी वार्षिक सर्वसाधारण सभेस ऑनलाईन पद्धतीने हजर नसलेल्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापीत (Condone) करणे.
१४) मा. अध्यक्षसो यांचे परवानगीने ऐनवेळी येणा-या विषयांवर विचार विनिमय करणे.

**टिप:** १) गणसंख्येच्या अभावी तहकुब झालेली सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी एक तासानंतर भरेल. त्यावेळी गणसंख्येची आवश्यकता भासणार नाही.

**सूचना :** १) सन्माननिय सभासदांनी सभेपुढे ठेवावयाच्या आपल्या लेखी सूचना व प्रश्न असतील तर बँकेच्या मुख्य कार्यालयात दि. २०/०९/२०२१ पर्यंत कार्यालयीन वेळेत पोहोचतील अशा रितीने पाठवावेत.

२) सभेपुढील विषयांची कागदपत्रे बँकेच्या मुख्य कार्यालयात तसेच शाखा कार्यालयात ऑफिस वेळेत पहावयास मिळतील. तसेच बँकेच्या वेबसाईटवर अहवाल उपलब्ध आहे याची नोंद घ्यावी.

३) तांत्रिक कारणामुळे सदर सभेचे कामकाज खंडीत झाल्यास त्रुटीचे निवारण झाल्यानंतर त्याच लिंकवर सभेचे कामकाज पुढे सुरु केले जाईल. कोणत्याही तांत्रिक कारणामुळे सभासदांना सभेस सामील होता आले नाही तर त्यास बँक जबाबदार राहणार नाही.

४) बँकेचा ०२३२३-२४६२५२ हा फोन नंबर सर्व सभासदांनी आपल्या मोबाईलमध्ये सेव्ह करुन घ्यावा. तसेच सभासदांचा बँक दप्तरी रजिस्टर असलेला नंबरलाच व्हॉटसअप लिंक प्राप्त होईल. सभासदांनी याकरीता आपले नांव, पत्ता, सभासद क्रमांक, व्हॉटसअप मोबाईल नंबर, ई-मेल आय.डी बँकेच्या नजिकच्या शाखेत दि. १८/०९/२०२१ पर्यंत द्यावेत.

५) पोटनियम दुरुस्तीबाबत माहिती बँकेच्या नोटीस बोर्डवर लावलेली आहे.

स्थळ : आजरा
दिनांक : १२/०९/२०२१

मा. संचालक मंडळ यांचे हुकुमावरुन
**जनता सहकारी बँक लि. आजरा**

**श्री. एम. बी. पाटील**
मुख्य कार्यकारी अधिकारी

**श्री. मुकुंद बळीराम देसाई**
चेअरमन


## विद्यमान संचालक मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| मा. श्री. मुकुंद बळीराम देसाई B.Com (Hons.) GDC & A, HDCM | चेअरमन | आजरा | सामाजिक कार्यकर्ते |
| मा. श्री. बाबाजी भाऊ नाईक | व्हा. चेअरमन | एरंडोळ | व्यावसायिक |
| मा. श्री. महादेव केशव टोपले | सर्व साधारण प्रतिनिधी | आजरा | व्यापारी |
| मा. श्री. रणजित नारायण देसाई | सर्व साधारण प्रतिनिधी | सुलगांव | बांधकाम व्यावसायिक व सामाजिक कार्यकर्ते |
| मा. श्री. विजय बाबुराव देसाई | सर्व साधारण प्रतिनिधी | वाटंगी | प्रगतशील शेतकरी |
| मा. श्री. जोतिबा गुंडू चाळके | सर्व साधारण प्रतिनिधी | देवर्डे | प्रगतशील शेतकरी |
| मा. श्री. सहदेव संतोबा नेवगे | सर्व साधारण प्रतिनिधी | गवसे | व्यापारी व सामाजिक कार्यकर्ते |
| मा. श्री. महादेव लक्ष्मण पोवार | सर्व साधारण प्रतिनिधी | कोवाडे | उद्योजक |
| मा. श्री. जयवंत गुंडोपंत शिंपी | सर्व साधारण प्रतिनिधी | आजरा | सामाजिक कार्यकर्ते |
| मा. सौ. रेखा सुरेश देसाई | महिला प्रतिनिधी | वाटंगी | सामाजिक कार्यकर्त्या |
| मा. सौ. वृषाली प्रकाश कोंडूसकर | महिला प्रतिनिधी | सोहाळे | उद्योजिका |
| मा. श्री. संदिप शिवाजी कांबळे | अनुसूचित जाती- जमाती प्रतिनिधी | दाभिल | सामाजिक कार्यकर्ते |
| मा. श्री. सुनिल खंडू डोणकर B.A.B.Com. | इतर मागास प्रतिनिधी | आजरा | व्यापारी |
| मा. श्री. शामराव कुशाप्पा चौगुले | भटक्या विमुक्त जाती प्रतिनिधी | भादवणवाडी | प्रगतशील शेतकरी |
| मा. श्री. एस. एम. अस्वले C.A. | तज्ञ संचालक | झुलपेवाडी | सी.ए. |
| मा. श्री. के. जी. पटेकर B.Com. GDC & A | तज्ञ संचालक | आजरा | बँकिंग तज्ञ |
| मा. श्री. एम. बी. पाटील B. Com. GDC & A,DBF, CAIIB | मुख्य कार्यकारी अधिकारी (९०११०९०३०४) | कौलगे (चंदगड) | अधिकारी |

## प्रमुख अधिकारी वर्ग

| | | |
|---|---|---|
| श्री. एम. आर. फर्नांडिस B.Com GDC & A | असि. मॅनेजर | ९०११०९०३०७ |
| श्री. पी. ए. सरंबळे B.Com, GDC & A, HDCM. | बोर्ड सेक्रेटरी व प्रशासन विभाग प्रमुख | ९०११०९०३०६ |
| श्री. एम. वाय. सावंत B.Com GDC & A | मुख्य वसुली अधिकारी | ८३०८८३७९२१ |
| श्री. एस. एच. चौगुले B.Com, | अकौंटस विभाग प्रमुख | ८८८८८६७६१० |
| श्री. एस.बी. पाटील B.Com, GDC & A, DIT | आय.टी. विभाग प्रमुख | ८६६९६२४८१२ |

# श्रद्धांजली



कै. जयसिंगराव अमृतराव देसाई
(बाळदादा देसाई)



कै. बाळकृष्ण वासुदेव वाळके



कै. शिवाजी रामा घाटगे



कै. प्रकाश गणू कांबळे

**दुःख दुसऱ्यांचे जाणावे ! ऐकोनी तरी वाटोन घ्यावे !!**
**बरे वाईट सोसावे ! समुदायांचे !!**

अहवाल सालामध्ये भारतातील थोर नेते, संशोधक, शास्त्रज्ञ, तंत्रज्ञ, शहिद जवान, लेखक, साहित्यिक, कलावंत, शिक्षण तज्ञ, सामाजिक कार्यकर्ते, बँकेचे सभासद, हितचिंतक व कर्मचारी दिवंगत झाले त्यांना नम्रतापूर्वक भावपूर्ण श्रध्दांजली.
ईश्वर मृतांच्या आत्म्यास शांती देवो.

चेअरमन



श्री. मुकुंद देसाई

सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाचा

# ५९ वा वार्षिक अहवाल

**सन्माननीय बंधु-भगिनीनो,**

'श्री रवळनाथ ग्रामदैवत' आजरा याचे कृपार्शिवादाने आज प्रथमच ऑनलाईन संपन्न होत असलेल्या ५९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस आपण सर्वजण अगत्यपूर्वक ऑनलाईन उपस्थित राहीलात याबद्दल मी सर्व प्रथम सर्व संचालक मंडळाचे वतीने आपणांस धन्यवाद देतो व आपले हार्दिक स्वागत करतो.

ग्राहकाकडून ठेवी स्विकारणे व पात्र सभासदांना कर्ज पुरवठा करणे हे बँकेचे प्रमुख कार्य असून तंत्रज्ञानयुक्त बॅकींग सेवा देणे हे आपल्या बँकेचे मुख्य ध्येय उद्दीष्ट आहे. बँकेच्या माध्यमातून सर्व ग्राहकांना विकासाभिमुख सेवा देण्याचा बँकेचा मानस आहे. आपल्या बँकेचे कोल्हापूर, सांगली, सिंधुदुर्ग या जिल्हयांचे कार्यक्षेत्र असून नजिकच्या काळात सातारा, पुणे, ठाणे, मुंबई व उपनगरे ही बँकेच्या कार्यक्षेत्रात आणण्यासाठी बँक प्रयत्नशिल आहे.

**बँकींग मधील घडामोडी -**

सध्याचा कालखंड हा बँकींग करीता परिवर्तनाचा असून बँकींगमध्ये वेगाने घडामोडी होत आहेत. रिझर्व बँकेचे परिणामकारक नियंत्रण तसेच तंत्रज्ञानाच्या नवनवीन सुधारणा बँकींगमध्ये आमुलाग्र बदल घडवून आणत आहेत. त्याचप्रमाणे कोरोना महामारीने व लॉकडाऊनमुळे अर्थ कारणावर प्रचंड ताण आला असून त्याचा ही विपरीत परिणाम या क्षेत्रावर झालेला आहे.

**व्यवस्थापन मंडळ व सी.ई.ओ. यांची फेर नेमणूक** (Bord of Management & Re-appointment of CEO) -

बँकेचे कामकाज उच्च दर्जाचे व्हावे याकरीता रिझर्व बँकेने दि. ३१/१२/२०१९ चे सर्क्युलर नं DOR(PCB) BPD. Cir. No. 8/ 12.05.002/2019-20 ने व्यवस्थापन मंडळ नियुक्तीबाबत निर्देश दिले होते. त्याप्रमाणे बँकेने दि. २३/१२/२०२० चे बोर्ड मिटींगमध्ये व्यवस्थापन मंडळ नेमणूकीबाबत निर्णय घेतला असून सदरचे व्यवस्थापन मंडळ दि. ०१/०१/२०२१ पासून बँकेकडे कार्यरत आहे. सदर मंडळातील उच्चशिक्षीत व अनुभवी सदस्यांच्या ज्ञानाचा उपयोग बँकेचा दर्जा वाढविणेसाठी निश्चितपणे होईल अशी मला खात्री आहे.

दि. २५/०६/२०२१ चे रिझर्व बँकेचे परिपत्रकातील निर्देशानुसार बँकेच्या सी.ई.ओ. पदी फिट अँन्ड प्रॉपर क्रायटेरिया पुर्ण करणाऱ्या उमेदवाराची नेमणूक करणेचे निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन मा. संचालक मंडळ यांच्या दि. २४/०७/२०२१ च्या मिटींगमध्ये श्री. एम.बी. पाटील हे रिझर्व बँकेने निर्देशित केलेले सर्व क्रायटेरिया पूर्ण करणारे असलेने त्यांची बँकेच्या सी.ई.ओ. पदी फेरनेमणूक करुन तसा प्रस्ताव रिझर्व बँकेकडे पाठविलेला आहे. सदरच्या कार्यवाहीची नोंद घेवून मंजूरी द्यावी.

आपल्या बँकेने सर्व आव्हाने पेलून नेत्रदिपक प्रगती करत बँकेची प्रगती अखंडीत ठेवली आहे. बँकेच्या आर्थिक वर्षाअखेर ठेवी रु. २५१ कोटी ९० लाख असून कर्ज रु. १६३ कोटी ८३ लाख आहेत. अहवाल सालात बँकेस रु. ५ कोटी ८८ लाख ढोबळ नफा झाला असून रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे सर्व तरतुदी वजा करुन रु. १ कोटी २७ लाख इतका निव्वळ नफा झालेला आहे. बँकेच्या सर्व ग्राहकांचे सकारात्मक पाठींब्यामुळे आपण ही प्रगती साध्य केली आहे. बँकेच्या कर्जाची वसुली उत्तम असून बँकेकडील ग्रॉस एन.पी.ए. ४.९७ टक्के असून नेट एन.पी.ए. ०.७३ टक्के आहे. सर्व कर्जदारांना विनंती की त्यांनी आपल्या कर्जाचे हप्ते वेळेत भरून सहकार्य करावे.

**अधिकृत भागभांडवल :**

बँकेचे अधिकृत भाग-भांडवल २५ कोटीचे असून एका भागाची किंमत रु. १०० आहे. दि. ३१/०३/२०२१ इ. रोजी बँकेचे खपलेले भाग भांडवल रु. ९,८३,९७,०२५/- असून मागील वर्षी हे भाग भांडवल ८,६९,५५,७७५/- इतके होते. भाग भांडवलामध्ये आर्थिक वर्षात रु. १,१४, ४१,२५०/- ची वाढ झालेली आहे.

९७ व्या घटना दुरुस्तीप्रमाणे क्रियाशील सभासद होणेकरीता सभासदाने किमान रु. १०० चे १० भाग घेवून रु. १००० चे भाग धारण केले पाहिजेत. **लेखापरिक्षकांच्या सुचनेप्रमाणे ज्या सभासदांचे शेअर्स अपुर्णांकांत आहेत अशा सभासदांना लाभांश देता येणार नाही याची सर्व सभासदांनी नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे अक्रियाशील सभासद बँकेच्या निवडणूकीत मतदानास अपात्र राहतील याचीही सर्व सभासदांनी नोंद घ्यावी.**

**सभासद:**

बँकेकडे दि. ३१/०३/२०२१ इ. रोजी अ वर्ग सभासद संख्या २६९७० असून गतवर्षी दि. ३१/०३/२०२० इ. रोजी सभासद संख्या २५५२४ होती. अहवाल वर्षात ८० सभासद कमी झाले असून नवीन १५२६ सभासदांची वाढ झालेली आहे. केवळ संख्येने सभासदांची वाढ होण्याऐवजी क्रियाशील सभासदांची वाढ होणे बँकेच्या दृष्टीने यापुढे आवश्यक होणार आहे. तरी सर्व सभासदांनी आपले बँकेत किमान व्यवहार करुन क्रियाशील रहावे ही नम्र विनंती.

**ठेवी: रु. २५१,८९,६६,०८४.९३**

आपले बँकेकडील दि. ३१/०३/२०२० इ. रोजी एकूण ठेवी रु. २२५ कोटी ८२ लाख इतक्या होत्या. त्यामध्ये अहवालसालात रु. २६ कोटी ०८ लाख इतकी वाढ झाली असून दि. ३१/०३/२०२१ इ. रोजी बँकेकडील ठेवी रक्कम रु. २५१ कोटी ९० लाख इतक्या झालेल्या आहेत.

**टी.डी.एस. :**

जेष्ठ नागरिक ठेवीदारांना रु.५००००/- व इतर ठेवीदारांना रु. ४००००/- अहवाल सालातील व्याज रक्कमेवर टी.डी.एस. मध्ये सवलत आहे. त्यावरील व्याज मिळणाऱ्या ठेवीदारांनी दरवर्षी एप्रिल महिन्यात बँकेकडे १५ जी व १५ एच फॉर्म भरुन देवून त्यासोबत पॅनकार्ड झेरॉक्स सादर करावी. त्यामुळे टी.डी.एस. कपात टाळता येईल. त्याचप्रमाणे ज्या ठेवीदारांनी अद्याप पॅनकार्ड काढलेले नाही त्यांनी आपल्या बँकेमधून पॅनकार्ड काढून घ्यावे. ठेव खातेदारांनी आमच्या बँकेकडे सी.के.वाय.सी. ची पूर्तता करुन बँकेकडे एस.एम.एस. अलर्ट, मोबाईल बँकींग इ. तंत्रज्ञानयुक्त सेवेचा लाभ घ्यावा. बँकेने सर्व ठेवींचा विमा हप्ता डिपॉझीट इन्श्युरन्स अँन्ड क्रेडीट गॅरंटी कार्पोरेशन (डी.आय.सी.जी.सी) कडे वेळेत भरला असून **पाच लाखापर्यंत** सर्व ठेव रक्कमेला विमा संरक्षण आहे.

**ए.टी.एम. सेंटर्स व मोबाईल बँकिंग :**

बँकेने आजरा, महागांव, कोवाड, कोल्हापूर येथे अद्यावत तंत्रज्ञानयुक्त रिसायकलींग ए.टी.एम. सेंटर सुरु केली असून त्यास ग्राहकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. लवकरच शाखा शिनोळी, मुरगूड व गडहिंग्लज येथे ए.टी.एम. सेंटर सुरु करत आहोत. तरी जास्तीत जास्त खातेदारांनी बँकेच्या ए.टी.एम. कार्डचा /इन्स्टा कार्डचा वापर करुन कॅशलेस व लेस कॅश योजनेत पुढाकार घ्यावा. सदर इन्स्टा कार्ड खाते उघडताक्षणीच आपणास दिले जाईल.

बँकेकडील मोबाईल बँकिंगचा सर्व सभासदांनी लाभ घ्यावा ही विनंती.

**कर्जे: रु. १६३,८२,९४,००४.१२**

दि. ३१/०३/२०२० चे तुलनेत बँकेने वाटप केलेल्या कर्ज रक्कमेत रु. १५ कोटी ८३ लाख ची वाढ झालेली आहे.

प्रामाणिकपणे, वक्तशीर, ज्या त्या महिन्यात कर्ज परतफेड करणाऱ्या कर्जदारांचे प्रमाण बँकेकडे वाढत आहे ही समाधानाची

बाब आहे. मात्र ही सवय सर्वच कर्जदारानी पाळावी अशी अपेक्षा आहे. सर्व सभासदांनी बँकेकडील कर्ज योजनांचा लाभ घ्यावा. तसेच बँकेने केवळ ९ टक्के व्याजदराने सोने तारण कर्ज योजना सुरु केली असून त्याचा सर्वांनी लाभ घ्यावा. बँकेने आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळातर्फे रु. १० लाखापर्यंत व्याज परतावा मिळणारी व्यवसायासाठी कर्ज योजना सुरु केली असून सभासदांनी त्याची नोंद घ्यावी व आपल्या व्यवसायाची प्रगती करावी.

### संचालक व नातेवाईक यांना दिलेली कर्जः

रिझर्व बँकेचे निर्देशाप्रमाणे संचालक व त्यांचे नातेवाईक यांना कोणत्याही प्रकारचे अहवाल सालात कर्ज मंजूर केलेले नाही. यापूर्वी म्हणजे संचालक होणेपूर्वी अशी कर्जे आदा केलेली असलेस त्या कर्जाची माहिती त्यातील थकीत रक्कमेचा तपशिल रिझर्व बँकेस सादर करणे बँकावर बंधनकारक आहे. संचालक / संचालिका यांनी संचालक होणेपूर्वी घेतलेल्या येणे कर्जाची बाकी रु. १४.३८ लाख असून संचालकांचे अगर त्यांचे नातेवाईकांचे येणे कर्जापैकी थकबाकी काहीही नाही.

### थकबाकी / अनुत्पादक कर्जः

बँकेकडील दि. ३१/०३/२०२१ अखेर ३३३ कर्जदारांचेकडून रु. ४२२.२५ लाख थकबाकी रक्कम येणे आहे. थकबाकीचे येणे कर्जाशी प्रमाण २.५८ टक्के आहे. थकबाकी वसुलीस पर्याय नाही. थकीत कर्जदारांचेवर वसुलीसाठी तात्काळ कारवाई करणेचे बँकेचे धोरण आहे. मागील आर्थिक वर्षात एकूण २५ थकबाकीदारांचेवर रु. ५ कोटी ३६ लाख वसुलीकरीता कलम १०१ खाली दावे दाखल करुन वसुलीची कार्यवाही सुरु केली आहे. वसुलीसाठी जप्ती कारवाई यासारखे कटू प्रसंग टाळणेसाठी सभासदांनी आपले कर्ज खाते थकबाकीत जावू नये तसेच आपण ज्या कर्जास जामीनदार आहोत त्यांची खाती थकबाकीत नसलेबद्दल सतर्क रहावे.

### कर्ज निर्लेखन व व्याज सवलतः

थकबाकीमुळे बँकेच्या प्रगतीवर अडथळा निर्माण होतो. थकीत खात्यांच्या वसुलीसाठी बँकेने नेहमीच लवचिक धोरण स्विकारले आहे. जुन्या थकीत कर्जदारानी बँकेशी संपर्क करुन आपली जुनी थकबाकी पूर्ण करुन सन्मानाने बँकेच्या प्रगतीत सहभागी व्हावे ही विनंती. वसुलीस कठीण असणारे तसेच तारणाचा ऱ्हास झाला आहे अशी खाती मे. लेखापरिक्षक यांचे सुचनेप्रमाणे निर्लेखीत केली जात असून सदर कर्ज खाती निर्लेखीत केली असली तरी वसुलीचे सर्व कायदेशीर प्रयत्न सुरु आहेत.

### शासकीय लेखापरिक्षण व इतर लेखापरिक्षण :

बँकेकडील गत वर्षाचे लेखापरिक्षण मे. पाटील, घेवडे व महापुरकर आणि असोसिएटस यांनी पूर्ण केलेले असून त्यांनी बँकेच्या आर्थिक परिस्थितीबद्दल समाधान व्यक्त केलेले आहे. बँकेची आर्थिक परिस्थीती व प्रगती विचारात घेऊन त्यांनी बँकेस **ऑडीट वर्ग – 'अ'** दिलेला आहे.

बँकेकडे मुख्य कार्यालय व आजरा, महागांव, राजाराम रोड, कोल्हापूर व खरी कॉर्नर, कोल्हापूर या शाखांचे सम वर्ती लेखापरिक्षण मे. एस.आर. बकरे अँण्ड कंपनी यांनी पूर्ण केले आहे. त्याचप्रमाणे उर्वरीत शाखांचे अंतर्गत लेखापरिक्षण संदिप संकपाळ अन्ड कंपनी यांनी पूर्ण केलेले आहे.

मे. पाटील, घेवडे व महापुरकर आणि असोसिएटस व त्यांचे सहकारी वर्गाने लेखापरिक्षणातील केलेल्या सुचनाबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच मे. एस.आर. बकरे अँण्ड कंपनी व संदिप संकपाळ अँन्ड कंपनी यांचेही मी आभार मानतो.

**गुंतवणुक : रु. १०४,३०,८२,६९७/-**

बँकेकडील गुंतवणुक ही बँकेचे स्थैर्य व आर्थिक भक्कमपणा दर्शवित असते. बँकेची दि. ३१/०३/२०२१ इ. रोजीची गुंतवणूक रु. १०४ कोटी ३१ लाख इतकी आहे. बँकेकडील गुंतवणूक ही रिझर्व बँकेच्या नियमाप्रमाणे, सुरक्षितपणे त्याचप्रमाणे अधिक परतावा देणाऱ्या वित्तीय संस्था मध्ये त्याचप्रमाणे सरकारी व सरकारमान्य कर्ज रोखे यामध्ये केलेली आहे.

**सभासदाकरीता लाभांश :**

लाभांश हा सभासदांच्या जिव्हाळयाचा विषय आहे. अहवाल सालात बँकेने सभासदांना ८ टक्के इतका भरघोस लाभांश जाहिर केला असून सदर लाभांश सभासदांच्या खात्यात वार्षिक सर्वसाधारण सभेच्या मंजूरीनंतर सभासदांच्या बचत खात्यात जमा करणेत येईल.

**कर्ज व्यवस्थापन :**

तत्पर कर्ज मंजूरीसाठी बँकेकडे स्वतंत्र कर्ज विभाग निर्माण केला असून कागदपत्रांची छाननी करुन तात्काळ कर्ज मंजूरी दिली जाते. त्यामुळे सभासदांना वेळेत कर्ज पुरवठा केला जातो. त्याचप्रमाणे शाखा स्तरावर जरुर त्या कागदपत्रांची पूर्तता करुन घेवून रक्कम वितरीत केली जाते. सभासदांना नम्र विनंती की, रिझर्व बँकेच्या निर्देशाप्रमाणे आवश्यक असणाऱ्या कागदपत्रांची शाखांच्याकडे पूर्तता करुन कर्ज रक्कम मंजूर तारखेपासून तीन महिन्याच्या आत उचलली पाहिजे. अन्यथा दिलेली मंजूरी रद्द होते. फेर मंजूरी घेवून पुन्हा कर्ज उचलणेकरीता दिरंगाई होवू नये याची सर्वांनी नोंद घ्यावी.

दरमहा थकबाकी वसुलीकरीता सभासदांना फोनवरुन सुचना दिल्या जातात. तीन हप्ते थकल्यानंतर कर्ज खाते एन.पी.ए. होवू नये याकरीता प्रत्यक्ष गाठी भेटी घेवून वसुलीसाठी प्रयत्न केला जातो. मात्र कर्ज खाते एन.पी.ए. झालेनंतर वसुलीसाठी कायदेशीर कारवाई करणेची बँकेची प्रथा असून आपले कर्जाचे हप्ते सभासदांनी वेळेत भरावेत अशी नम्र विनंती आहे.

बँकेच्या ठेवीदार, सेव्हींग व चालू खातेदार यांना विनंती की, त्यांनी के.वाय.सी. पूर्तता, आधारकार्ड व पॅनकार्डने आपले सेव्हींग खाते लिंक करुन घ्यावे. तसेच आपले बदललेले पत्ते तसेच ई-मेल आय.डी. बँकेस देवून अपडेट रहावे.

**नफा विभागणी :**

दि. ३१/०३/२०२१ इ. रोजी संपलेल्या आर्थिक वर्षामध्ये बँकेस रक्कम रु. ५ कोटी ८८ लाख इतका ढोबळ नफा झालेला आहे. सर्व वैधानिक तरतूदी वजा जाता बँकेस रक्कम रु. १२७.२९ लाख इतका निव्वळ नफा झालेला आहे. दि. १८/०८/२०२१ इ. रोजी झालेल्या संचालक मंडळाच्या मिटींगमध्ये खाली दर्शविल्याप्रमाणे नफ्याची विभागणी करणेस संचालक मंडळांनी शिफारस केली असून त्यासाठी मंजूरी द्यावी ही विनंती.

| अ.नं. | नफा विभागणी | रक्कम रूपये |
|---|---|---|
| १ | रिझर्व फंड २५ टक्के | ३१९५९७७.०० |
| २ | निवडणूक निधी | १५०००००.०० |
| ३ | अमृत महोत्सव निधी | २००००.०० |
| ४ | सेवक कल्याण निधी | १०००००.०० |
| ५ | आकस्मित खर्च व नुकसान निधी | १०००००.०० |
| ६ | गुंतवणूक चढ-उतार निधी | २०००००.०० |
| ७ | तंत्रज्ञान विकास निधी | ५०००००.०० |
| ८ | डिव्हीडंट ८ टक्के | ६९५६४६२.०० |
| ९ | इमारत निधी | १५६५४२.३३ |
| | **एकूण** | **१२७२८९८१.३३** |

**भांडवल पर्याप्तता :**

रिझर्व बँकेने जिंदगीवरील जोखमीचे मुल्य व स्वभांडवलाशी प्रमाण ९ टक्के निर्धारीत केले आहे. आपले बँकेकडील भांडवल पर्याप्तताचे प्रमाण १४.२३ टक्के आहे. आपली बँक व्यवसायीक जबाबदारी पार पाडण्यास सक्षम असलेचे या प्रमाणावरुन सिद्ध होते.

**बँकेचे कार्यक्षेत्र व शाखा विस्तार :**

बँकेचे कार्यक्षेत्र कोल्हापूर, सांगली व सिंधुदुर्ग या तिन्ही जिल्हयात सिमीत असून बँकेचे कार्यक्षेत्र नजीकचे सातारा, पुणे, ठाणे, मुंबई व उपनगरे या जिल्हयामध्ये वाढविण्याचा बँकेचा मानस असून याकरीता पोटनियम दुरुस्ती करणे आवश्यक आहे. त्याचे परिशिष्ठ अहवालात जोडले आहे. त्या पोटनियम दुरुस्तीस आपण मंजूरी द्यावी अशी नम्र विनंती आहे.

**पंतप्रधान विमा योजना :**

केंद्रिय वित्त मंत्रालयाने जाहिर केलेल्या पंतप्रधान जिवन ज्योती विमा योजना (PMJJBY) व पंतप्रधान जिवन सुरक्षा विमा योजना (PMJSBY) बँकेने स्विकारले असून या योजनेची यापूर्वी निर्धारीत केल्याप्रमाणे प्रिमीयमची रक्कम अनुक्रमे रु. ३३०/- व १२/- संबंधीत खातेदारांच्या सेव्हिंग खात्यात नावे टाकून भरणा केलेली आहे. याचा जास्तीत जास्त सभासदांनी विमा हप्ता भरुन लाभ घ्यावा.

**आभार व समारोप -**

अहवाल सालात मा. सहकार आयुक्त व निबंधकसो, महाराष्ट्र राज्य पुणे त्याचप्रमाणे मा. सहनिबंधक, सहकारी संस्था कोल्हापूर तसेच मा. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था कोल्हापूर, कोल्हापूर जिल्हा नागरी बँकस् असोसिएशन कोल्हापूर यांचे पदाधिकारी, वसुली कक्षाचे अधिकारी तसेच आण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळचे अधिकारी यांनी बँकेस अहवाल सालात भेट देवून मौलीक सुचना केल्या त्याबद्दल मी सर्वांचा अत्यंत आभारी आहे. त्याचप्रमाणे बँकेच्या कार्यक्षेत्रातील सहकारी संस्था, पतसंस्था, व्यक्ती सभासद, ग्राहक यांनी बँकेच्या प्रगतीत नेहमीच हातभार लावला आहे. त्याचा मी ऋणी आहे. तसेच जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., कोल्हापूर व इतर आर्थिक, सामाजिक संस्था यांच्या पदाधिकारी / अधिकारी यांचा आभारी आहे.

दै.पुढारी, लोकमत, सकाळ, तरुण भारत, पुण्य नगरी या तसेच इतर दैनिकांनी बँकेच्या कार्यक्रमाना अग्रक्रमाने प्रसिद्धी दिली त्याबद्दल सवांचे आभार मानतो. त्यांचे यापुढेही असेच सहकार्य लाभावे अशी विनंती करतो.

**जयहिंद -जय महाराष्ट्र जय सहकार !**

आपला नम्र

**मुकुंद बळीराम देसाई**

चेअरमन, जनता सहकारी बँक लि. आजरा

## उद्देशानुरूप कर्ज

दिनांक ३१/०३/२०२१ अखेर (रक्कम रूपये लाखात)

| अ.नं. | तपशिल | कर्जदार संख्या | येणे कर्ज | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | लघुउद्योग | १५७ | ८२८.८७ | ५.०६ |
| २ | व्यापारी उद्योग व छोटे व्यावसायिक | २४२ | ३४६०.६२ | २१.१२ |
| ३ | वाहतूक साधने | १३२८ | १८४१.३७ | ११.२४ |
| ४ | घरबांधणी कर्जे | ४०४ | २४७५.४१ | १५.११ |
| ५ | स्वयंरोजगार | -- | -- | -- |
| ६ | शेती व शेती पुरक व्यवसाय | २८९८ | ३२४५.१८ | १९.८१ |
| ७ | इतर कर्जे | ४०४५ | ४५३१.४९ | २७.६६ |
| | **एकूण** | **९०७४** | **१६३८२.९४** | **१००%** |

## अग्रक्रम व दुर्बल घटक कर्जे

दिनांक ३१/०३/२०२१ अखेर (रक्कम रूपये लाखात)

| अ.नं. | तपशिल | ३१ मार्च २०२० | | ३१ मार्च २०२१ | |
|---|---|---|---|---|---|
| | | रक्कम | टक्केवारी | रक्कम | टक्केवारी |
| १ | एकूण दिलेली कर्जे | १४८१०.८३ | --- | १६३८२.९४ | --- |
| २ | अग्रक्रम कर्जे | १११७२.२८ | ८३.८३% | १०५२६.७३ | ७१.०७% |
| ३ | दुर्बल घटक कर्जे | २०९८.८० | १५.७५% | ३४५१.४३ | २३.३०% |

## कालनिहाय व तारण निहाय थकबाकी

दिनांक ३१/०३/२०२१ अखेर (रक्कम रूपये लाखात)

| थकबाकी | तारण कर्ज | | बिगरतारण कर्ज | | एकूण थकबाकी | |
|---|---|---|---|---|---|---|
| कालावधी | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम |
| १ वर्ष | १६५ | ९४.३२ | ९३ | १.४७ | २५८ | ९५.७९ |
| १ ते ३ वर्ष | ९ | २४.९४ | २ | १३.५१ | ११ | ३८.४५ |
| ३ वर्षावरील | ६३ | २८१.०६ | १ | ६.९५ | ६४ | २८८.०१ |
| **एकूण** | **२३७** | **४००.३२** | **९६** | **२१.९३** | **३३३** | **४२२.२५** |

# शासकीय लेखापरिक्षकाचा अहवाल

**महाराष्ट्र सहकारी कायद्या च्या कलम ८१ (५) (ब) व नियम ६९ नुसार)**

आम्ही सोबत जोडलेल्या जनता सहकारी बँक लि. आजरा या बँकेच्या ३१ मार्च २०२१ अखेरचा एकत्रीत ताळेबंद (प्रधान कार्यालयव १४ शाखा) व त्या दिवशी संपणाऱ्या अर्थिक वर्षाचे एकत्रीत नफा तोटा पत्रकाचे लेखापरिक्षण केलेले आहे. सदरची अर्थिक पत्रके ही बँकेच्या व्यवस्थापनाने बनविलेली असून ती त्यांची जबाबदारी आहे. सदर अर्थिक लेखापरिक्षणावरून त्यावर अभिप्राय व्यक्त करणे इतकीच आमची जबाबदारी आहे.

भारतामध्ये प्रचलीत असलेल्या लेखापरिक्षणाच्या मानदंडपध्दतीनुसार (Standard) आम्ही संस्थेचे लेखापरिक्षण केले आहे. सदरच्या आदर्श पध्दतीनुसार, संस्थेच्या अर्थिक पत्रकामध्ये कोणतेही मोठे/महत्वाचे (Material) चुकीचे विधान नाही याची रास्त खात्री करण्याच्या दृष्टीने लेखापरिक्षणाचा आराखडा करणे व लेखापरिक्षण करणे जरूरीचे असते. लेखापरिक्षणात नमुना परिक्षण पध्दतीने (Test Check) आर्थिक पत्रकातील रकमा व त्याचे सादरीकरण (Disclosure) यासंदर्भातील पुराव्याच्या तपासणीच्या समावेश असतो. लेखापरिक्षणाम ध्ये लेखाकर्माच्या तत्वाचा वापर व व्यवस्थापनाने केलेले महत्वाचे अंदाज याची तपासणी तसेच अर्थिक पत्रकाम धील सर्वागीण सादरीकरणाचे मुल्यांकन यांचाही समावेश असतो. लेखापरिक्षण अहवालातील मत प्रदर्शनाला पुरेसा आधार आहे अशी आमची खात्री आहे. उपरोक्त अर्थिक पत्रकाबद्दल आम्ही जोडलेल्या टिपणी व शेऱ्यास पात्र राहून आम्ही अहवाल करतो की,

१) सदर बँकेचे प्रधान कार्यालय व १४ शाखा यांचे लेखापरिक्षण आम्ही केले आहे.

२) आमच्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपुर्ण ज्ञानाप्रमाणे महितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरूरती माहिती व खुलासे आम्हास उपलब्ध झाले असून ती सर्व महिती व खुलासे समाधानकाराक आहेत.

३) आमच्या मते व आम्हाला मिळालेल्या माहिती व खुलाशाच्या आधारे आणि आम्ही केलेल्या व सोबत जोडलेल्या अहवालाच्या भाग ''अ'' ''ब'' व ''क'' मधील नमुद शेऱ्यास अनुरून संस्थेचे ताळेबंद व नफा तोटापत्रक महाराष्ट्र सहकारी कायद्या १९६० ला अनुसरून तयार केलेले आहेत आणि आमच्या मते संपुर्ण महितीप्रमाणे तसेच आम्हास देण्यात आलेल्या खुलाशावरून व लेखापरिक्षण अहवालाच्या भाग 'अ'' ''ब'' व ''क'' मधील नमुद शेऱ्यास अनुरून

अ) ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेने ठेवलेल्या हिशोब पुस्तकाशी जुळते असून सदर ३१ मार्च २०२१ या दिनांकाचा ताळेबंद बँकेच्या व्यवहाराची/कामकाजाची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो आणि नफा तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शविती (लेखापरिक्षण अहवालातील नफा तोटा विवेचनातील शेऱ्यास पात्र राहून व महत्वाचे शेऱ्यास पात्र राहून)

ब) संस्थेचे हिशोब हे त्यावरील टिप्पणीस पात्र राहून महाराष्ट्र सहकारी संस्थांच्या कायद्यानुसार आवश्यक ती माहिती देणारे आहेत व संस्थेच्या अर्थिक व्यवहाराची सत्य व वास्तवस्थिती दर्शवितात -

४) आमच्या मते एकत्रीत ताळेवंद बँकींग रेग्युलेशन ॲक्ट १९४९ (ॲज अँप्लीकेबल टू को-ऑपरेटीव्ह सोसायटी) चे तिसऱ्या परिशिष्ठातील नमुण्याप्रमाणे कर्ज या खात्यातील पोटकलमातील माहितीसह रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या नियमानुसार तयार करण्यात आला आहे .

५) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पतीस येईल त्यावरून संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थाचा कायदा १९६० व त्याखालील नियम व संस्थेच्या पोटनियमाप्रमाणे अपेक्षीत असल्या प्रमाणे पुस्तके ठेवली आहेत.

६) सन २०२०-२१ या वर्षा करीता महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा १९६० खालील नियमानुसार व नवीन निकषाच्या आधारे बँकेस **'अ'** वर्ग देणेत आला आहे.

स्थळ : कोल्हापूर.
दिनांक : ३१/०८/२०२१

**मे. पाटील घेवडे महापूरकर ॲन्ड असोसिएटस**
सनदी लेखापरीक्षक
**श्री. के. एस. पाटील**
भागीदार
(मेबरशिप नं. ११८१०३)
एफ.आर.एन. १२६०००W
UDIN - 21118103AAAAMH8839



जिंदगी व देणी

ताळेबंद पत्र नं. २

| दिनांक ३१/०३/२०२० रूपये पैसे | तपशिल | दिनांक ३१/०३/२०२१ रूपये पैसे | रूपये पैसे |
|---|---|---|---|
| २५,००,००,०००.०० | **१) अधिकृत भाग भांडवल** | २५,००,००,०००.०० | २५,००,००,०००.०० |
| | २५०००००० भाग प्रत्येक भाग रू. १०० चा एक | | |
| ८,६९,५५,७७५.०० | **वसुल झालेले भागभांडवल** | | ९,८३,९७,०२५.०० |
| ८,६९,५५,७७५.०० | १) व्यक्तीगत | ९,८३,९७,०२५.०० | |
| | २) सहकारी संस्था | | |
| | ३) राज्य सरकार | | |
| १५,६२,३७,८९६.६४ | **२) गंगाजळी व इतर निधी** | | १९,५२,२८,५२७.०७ |
| ४,६०,१५,०९६,.७५ | १) गंगाजळी (रिझर्व्ह फंड) | ४,९०,०४,०२३.०० | |
| २,२०,००,१८५.६२ | २) इमारत निधी | २,३५,४८,५३५.५५ | |
| ६,१३,८८,५६५.२७ | ३) बुडीत व संशयीत निधी | ७,००,२०,२१४.५२ | |
| ६७,७५,०००.०० | ४) उत्तम जिंदगी तरतूद | ७५,००,०००.०० | |
| १०,८१,४२८.०० | ५) लाभांश समिकरण निधी | १०,८१,४२८.०० | |
| ४,७५,०००.०० | ६) सहकार प्रसार व प्रशिक्षण | ४,७५,०००.०० | |
| ३८,००,०००.०० | ७) गुंतवणूक चढ उतार निधी | ६३,००,०००.०० | |
| ३,२५,०००.०० | ८) धर्मादाय निधी | ३,२५,०००.०० | |
| २,५०,०००.०० | ९) विकास निधी | २,५०,०००.०० | |
| ७,८०,०००.०० | १०) अमृत महोत्सव निधी | ८,००,०००.०० | |
| ५,००,०००.०० | ११) आकस्मित खर्च निधी | १०,००.०००.०० | |
| ५,००,०००.०० | १२) कर्मचारी कल्याण निधी | ५,७५,०००.०० | |
| १०,००,०००.०० | १३) निवडणूक निधी | २०,००,०००.०० | |
| १,०८,४७,६२१.०० | १४) गुंतवणूक घसारा निधी | ३,०३,४९,३२६.०० | |
| ५,००,०००.०० | १५) तंत्रज्ञान विकास निधी | २०,००,०००.०० | |
| २,२५,८२,३७,६१६.१८ | **४) मुदत ठेवी व इतर ठेव खाती** | | २,५१,८९,६६,०८४.९३ |
| १०,२३,४४,८६५.०४ | **१) चालू खाते व पिग्मी** | १३,०२,१२,८२५.५३ | |

जिंदगी व येणी

ताळेबंद पत्र नं. २

| दिनांक ३१/०३/२०२० रूपये पैसे | तपशिल | दिनांक ३१/०३/२०२१ रूपये पैसे | रूपये पैसे |
|---|---|---|---|
| **३,९४,९१,९४३.२५** | **१) रोख शिल्लक** | | **५,२७,०७,८४९.१८** |
| **३,९४,९१,९४३.२५** | हातातील रोख शिल्लक | ५,२७,०७,८४९.१८ | |
| **८,३४,६०,५९४.९५** | **२) बँकेतील शिल्लक** | | **९,८९,०२,९७३.४४** |
| ३२,६२,६२६.८४ | १) महाराष्ट्र राज्य सह. बँक लि. मुंबई | १,०२,०४,५०६.५६ | |
| ४१,४३,१३३.५७ | २) कोल्हापूर जि.म.सह. बँक लि. | ५९,९२,२२१.२७ | |
| ६,२२,२७५.७९ | ३) सिंधुदुर्ग जि.म. बँक लि. सावंतवाडी | १०,९६,१८८.६७ | |
| ७,०८,००,५३५.०३ | ४) स्टेट बँक ऑफ इंडिया व संलग्न नोटी फाईड बँका | ८,०८,५६,२०४.३८ | |
| ४६,३२,०२३.७२ | ५) इतर बँकातील शिल्लक | ७,५३,८५२.५६ | |
| ---- | ६) मागणी व अल्प सुचना ठेवी | ---- | ---- |
| **९१,३८,३३,२१४.००** | **३) मुदत बंद ठेवी व गुंतवणूक** | | **१,०४,३०,८२,६९७.००** |
| **२३,४५,७४,४४०.००** | **अ) मुदत बंद ठेवी** | **३२,३१,१३,४९४.००** | |
| ९,१५,००,०००.०० | १) जिल्हा मध्यवर्ती सह. बँका | १०,१०,००,०००.०० | |
| ५,७४,४४०.०० | २) स्टेट बँक ऑफ इंडिया व संलग्न नोटीफाईड बँक | १,९६,११,४९४.०० | |
| १४,२५,००,०००.०० | ३) इतर बँका | २०,२५,०२,०००.०० | |
| **६७,९२,५८,७७४.००** | **ब) गुंतवणूक** | **७१,९९,६९,२०३.००** | |
| ३६,९७,६०,२४४.०० | १) सरकारमान्य कर्ज रोखे | ५२,०२,३७,३५३.०० | |
| ३०,९०,९७,५३०.०० | २) ट्रेझरी बील | १९,९३,३०,८५०.०० | |
| ४,०१,०००.०० | ३) सहकारी संस्था शेअर्स | ४,०१,०००.०० | |
| **१,४८,१०,८२,८५८.८२** | **६) दिलेली कर्जे** | | **१,६३,८२,९४,००४.१२** |
| | **अ) अल्प मुदत कर्जे** | | |
| | १) तारण कर्ज | | |

